ePaper

## पवार कुटुंबात मॅच फिक्सिंग नाही, 'कमळा'वर नव्हे तर 'घड्याळा'वर लढणार: अजित पवार



| वर्ष - 7 । अंक - 225 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- पुनियाने फूटपाथवर ठेवला 'पद्मश्री'
- सुकेशची जॅकलीनला धमकी?
- जनता खरगे-फरगेंना ओळखत नाही
- महाडमध्ये शिवसेनेच्या गटांत राडा

www.mahaenews.com | । शनिवार, दिनांक 23 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# तापमानवाढीवर प्रभावी उपाययोजना

# महापालिकेचा 'हीट ॲक्शन प्लॅन'!

## » उपायुक्त चंद्रकांत इंदलकर: विशेष कार्यशाळेचे आयोजन



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तापमानवाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी नागरी सहभाग महत्वाचा असून यासाठी महापालिका तयार करत असलेला पिंपरी चिंचवड शहराचा हीट ॲक्शन प्लॅन उपयुक्त ठरणार आहे, असे सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर म्हणाले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात 'हीट ॲक्शन प्लॅन' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सह आयुक्त इंदलकर बोलत होते.

या कार्यक्रमास आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, संजय कुलकर्णी, उप आयुक्त मनोज लोणकर, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बंसल, डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या प्रा. डॉ. प्राजक्ता कुलकर्णी, पुणे नॉलेज क्लस्टरच्या कार्यक्रम व्यवस्थापक अश्विनी केसकर, सुर्या फर्निटिकचे संचालक विश्वास दिक्षीत, व्रिंदा दिक्षीत, सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे, निलेश करकरे, सामाजिक कार्यकर्त्या विद्या कुंभार यांच्यासह आरोग्य, वैद्यकीय, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, नगररचना, स्थापत्य, पाणीपुरवठा आदी विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्युंचे प्रमाण वाढले...

प्रा. डॉ. प्राजक्ता कुलकर्णी म्हणाल्या, जगातील अनेक देशांसह भारतानेही वाढते वातावरणातील तापमान हा विषय गांभिर्याने घेतला आहे. भारतातील अनेक शहरांमध्ये याबाबत उपाययोजना करण्यात येत आहेत. उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्युंचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून दरवर्षी जागतिक तापमानातही वाढ होताना दिसत आहे.

या सर्व बाबींचा दैनंदिन कामकाज करत असताना अनेक लोकांच्या जीवनावर परिणाम होत आहे. तापमान बदल व वाढत्या उष्णतेबाबत पुरेशी काळजी आणि उपाययोजना केल्या नाही तर उद्भवणाऱ्या समस्यांचा प्रत्येक घटकाला सामना करावा लागू शकतो. उन्हाळ्यामुळे उद्भवणाऱ्या समस्यांमध्ये प्रामुख्याने अतिसारासारखे पचनक्रियेशी संबंधित आजार आणि उष्माघात या आजारांचा समावेश असतो. याशिवाय त्वचेसंदर्भात समस्या देखील उद्भवू शकतात. वातावरणातील कमाल तापमानात ४ डिग्री ते ५ डिग्रीपेक्षा अधिक वाढ झाली असेल तर उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवली जाते, असे त्या म्हणाल्या.

### भारतातील 44 शहरांत तापमान जास्त...

» रात्रीच्या वेळी अनेक शहरांचे तापमान जास्त असते असे शहरी तापमानाबाबत केलेल्या अभ्यासात निदर्शनास आले आहे. त्यामध्ये भारतातील ४४ शहरांचा समावेश आहे, यात ग्रामीण भागांचाही समावेश आहे. शहरातील विविध भागांमध्ये झाडांचे प्रमाण जास्त असले तरी रात्रीच्या वेळी तापमान कमी होण्यास अधिक वेळ लागत असल्याचे अभ्यासात समोर आले आहे. त्यामुळे उष्णतेच्या लाटेचा प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी प्रशासकीय आणि शहरी नियोजन करणे गरजेचे असून सार्वजनिक पायाभूत सुविधा, जनजागृती, क्षमता निर्माण आणि तापमानाचा सर्वात जास्त परिणाम होणारे समुदाय ओळखून योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे प्रा. डॉ. कुलकर्णी यावेळी म्हणाल्या.

### दीर्घकालीन उपाययोजनांची मांडणी करणार...

» शहरी तापमान आटोक्यात आणण्यासाठी किंवा तापमानाच्या लाटेचा सामना करण्यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपायांवर या कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. यामध्ये उड्डाणपुलांच्या खाली विसावा घेण्यासाठी जागा निर्माण करणे, रहदारीच्या ठिकाणी पाण्याची फवारणी करणे, शहरातील उद्यानांच्या वेळेत बदल करणे, दुपारी १२ ते ३ दरम्यान काही भागातील वाहतूक सिग्नल बंद करणे, बांधकामांच्या ठिकाणी किंवा घराबाहेर काम करणाऱ्या कामगारांच्या वेळेत बदल करणे, पोलिस स्टेशन, दवाखाने तसेच रुग्णालयांमध्ये उष्णता आपत्कालीन प्रतिसाद पथके स्थापन करणे अशा विविध अल्पकालीन उपायांचा समावेश होता. शहराच्या नागरी क्षेत्राच्या अभ्यासात्मक विश्लेषणानंतर दीर्घकालीन उपायांची मांडणी करण्यात येणार असल्याची माहिती प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी दिली.

# चाचण्या वाढविण्याचे सावंतांचे निर्देश!

## वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग सतर्क

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात कोरोनाच्या (COVID 19) 'JN1' या नवीन व्हेरियंटचे रुग्ण आढळले असले तरी नागरिकांनी घाबरुन न जाण्याचं आवाहन केलं आहे. तसेच कोविडशी संबंधित सर्व नियमांचं योग्य रितीने पाल करण्याचे आवाहन देखील आरोग्य मंत्री तानाजी सांवत यांनी केलंय. 'JN1' साठी आरोग्य यंत्रणा सज्ज असून, संशयित रुग्णांच्या चाचण्या वाढविण्याचे, त्यांचे सर्वेक्षण अधिक सक्षम करण्याचे आणि त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करण्याचे निर्देशही तानाजी सावंत यांनी दिलेत.**

'JN1' या नवीन व्हेरियंटच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर तानाजी सावंत यांनी आरोग्य विभागाच्या तयारीचा गुरुवार 22 डिसेंबर रोजी आढावा घेतला. आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानचे संचालक धीरज कुमार, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांचे आयुक्त, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच आरोग्य विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी या बैठकीला दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी तानाजी सावंतांनी म्हटलं की, जिल्हास्तरावर रुग्णालयांतील यंत्रणेचे गांभीर्याने मॉकड्रिल करून तीन दिवसांत याविषयीचा अहवाल सादर करावा. 'JN1' हा व्हेरियंट धोकादायक नसला तरी आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सर्व तयारीनिशी सतर्क राहावे. नागरिकांमध्ये अफवा पसरून भीतीचे वातावरण निर्माण होणार नाही याची काळजी जिल्हास्तरापासून घेण्यात यावी. यासाठी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करावी.



हलगर्जीपणा न करता आरोग्य यंत्रणा, विलागीकरण कक्ष, ऑक्सिजनची सुविधा, अतिदक्षता विभाग, व्हेंटीलेटर आणि महत्त्वाची उपकरणे कार्यरत आहेत की नाही याची प्रत्यक्ष जाऊन तपासणी करावी आणि त्याबाबतचे व्हिडिओ तयार करून राज्यस्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवावेत. प्रत्येक जिल्ह्यात संशयित रुग्णांच्या चाचण्यांची संख्या वाढविण्याची गरज असून चाचणी, सर्वेक्षण आणि उपचार या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, अशी सूचना देखील तानाजी सावंतांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेत. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी समाजमाध्यमांसह जिल्हा रुग्णालय, आपला दवाखाना येथे फलक लावण्यात यावेत. त्याचप्रमाणे नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरू नये यासाठी माध्यमांना माहिती देण्यासाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. या अधिकाऱ्यामार्फतच याविषयीची अधिकृत माहिती देण्यात यावी. जेणेकरून अफवा आणि चुकीची माहिती प्रसारित होणार नाही. प्रसार माध्यमांनीही याविषयीचे वृत्त देताना वस्तुस्थितीची पडताळणी करावी आणि नागरिकांमध्ये विनाकारण भीती पसरेल अशी चुकीची माहिती प्रसारित करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे . एक आठवड्यात मूल्यमापन करून टास्क फोर्स बाबत निर्णय घेण्यात येईल असही तानाजी सावंतांनी म्हटलं. आरोग्यमंत्री सावंत यांनी राज्यातील वैद्यकीय व्यवस्थेच्या तयारीचा आढावा घेतला. यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले की, राज्यातील आरोग्य व्यवस्थेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आज बैठक झाली. केरळमध्ये जेएन.१ आढळून आल्यानंतर लगेचच आम्ही मॉक ड्रीलचे नियोजन केले होते. त्यानुसार १७ व १८ डिसेंबरला राज्यभरात आरोग्य व्यवस्थांचे मॉक ड्रील झाले. त्यात आरोग्य व्यवस्थेची सज्जता, साधनसामग्री, रुग्णालयातील खाटा यासह इतर बाबींचा आढावा घेण्यात आला. याचबरोबर पूर्वतयारीची पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यात करोनाचा उपप्रकार जेएन.१चा आतापर्यंत एक रुग्ण आढळून आला आहे. या रुग्णाची लक्षणे आणि जेएन.१ उपप्रकाराबाबत इतर बाबी तपासल्या जात आहेत. याबाबत पुढील ४८ तासांत सरकारला अहवाल मिळेल. त्यानंतर हा उपप्रकार किती धोकादायक आहे, हे स्पष्ट होईल, असे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी शुक्रवारी सांगितले. याचबरोबर करोनाच्या वाढलेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कृती पथकाची स्थापना करण्याची घोषणाही त्यांनी केली.

### करोनाचा संसर्ग घातक स्वरुपाचा नाही

» राज्यात सिंधुदुर्गमध्ये जेएन.१ चा एकमेव रुग्ण सापडला आहे. त्याला कुठून संसर्ग झाला याची तपासणी केली जात आहे. त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची तपासणी केली जात आहे. या रुग्णाची लक्षणे आणि इतर बाबींवर आम्ही लक्ष ठेवून आहोत. त्याचा अहवाल ४८ तासांत सरकारला मिळेल. हा अहवाल मिळाल्यानंतर हा उपप्रकार किती धोकादायक आहे, हे स्पष्ट होईल. सध्या करोनाचा संसर्ग वाढत असता तरी तो घातक स्वरुपाचा नाही, असे सावंत यांनी स्पष्ट केले. उपप्रकार पहिल्यांदा केरळमध्ये आढळून आला. केरळमधील अहवाल आम्हाला मिळाला आहे. तिथे मृत्यू झालेल्या तीन रुग्णांपैकी दोघांना इतर आजार होते. तसेच त्यांचा वयोगट ७५ वर्षांपुढील होता. हा उपप्रकार धोकादायक नसून सौम्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे, असे आरोग्य मंत्री तानाजी सांवत यांनी स्पष्ट केले.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज

## सर्व सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्याची पूर्वतयारी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पेरणे फाटा येथे 1 जानेवारी रोजी आयोजित (PUNE NEWS) करण्यात आलेला विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांतता आणि उत्साहात साजरा व्हावा, यासाठी आवश्यक सर्व सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्याची पूर्वतयारी करण्यात आली असून सोहळ्याच्या नियोजनासाठी प्रशासन सज्ज आहे, असं जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी सांगितलं आहे.**



डॉ. देशमुख म्हणाले, दरवर्षी साजरा होणारा विजयस्तंभ अभिवादन सोहळा हा महत्वाचा आणि भावनिक कार्यक्रम आहे. यावर्षी अधिक अनुयायी येण्याचे गृहीत धरून सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून शासनातर्फे समिती गठीत केली आहे. 210 एकरात 33 ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था, पीएमपीएल बसेससाठी 4 ठिकाणी थांब्याची सोय, राखीव वाहनतळ, वीज, आकर्षक रोषणाई, बुक स्टॉल, शुद्ध पाण्याची व्यवस्थेसाठी 150 टँकर्स, फिरते शौचालय, आरोग्य सेवेसाठी 15 पथके, 259 वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, 50 रुग्णवाहिका, 27 जनरेटर सेट, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकासोबत स्वयंसेवक बोटी इत्यादी आवश्यक सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी 4 हजार पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. 31 डिसेंबर रोजी 475 पीएमपीएल बसेस तर 1 जानेवारी 2024 रोजी 575 पीएमपीएल बसेसचे नियोजन केले आहे. प्रत्येक बसवर दोन कर्मचारी, राखीव चालक, यांची नेमणूक करण्यात आली आहे. पुणे पोलीस विभागाकडून पुणे-नगर महामार्गावरील वाहतूक वळविण्याचे आदेश जारी केले आहेत. वाहतूकीतील बदलांविषयी नागरिकांना पूर्वसूचना देण्यात येईल. सर्व अनुयायांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, म्हणून प्रशासन योग्य ती दक्षता घेत आहे. नियोजन करताना विविध संघटना आणि नागरिकांच्या सूचना लक्षात घेण्यात येतील. आयोजनादरम्यान कोणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि आनंदाच्या वातावरणात सोहळा साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

### अनुयायांची मोठी गर्दी

» सोहळा अधिक चांगल्या पद्धतीने करण्यासाठी विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी दिलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल. सोहळा शांतता, संयम आणि त्याच उंचीने साजरा करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्री. देशमुख यांनी केले. विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सोहळ्याच्या आयोजनाबाबत सूचना केल्या आणि सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करणार असल्याचे प्रतिनिधींनी सांगितले. 1 जानेवारीला पेरणे फाटा येथे विजयस्तंभ अभिवादन सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येतो. अनेक अनुयायी गर्दी करतात. त्यांना कोणताही त्रास होऊ नये, याची संपूर्ण काळजी प्रशासनाकडून घेतली जाते.

# शास्तीकर माफीमुळे 152 कोटींचा ‘गल्ला’!

## ऐतिहासिक निर्णयाची यशस्वी वर्षपूर्ती : मिळकतधारकांमध्ये समाधान

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील नधिकृत बांधकाम नियमित करण्यासाठी तत्कालीन आघाडी सरकारने लादलेली शास्तीकर माफीच्या निर्णयाला एक वर्ष पूर्ण झाले. या कालावधीत महापालिकेच्या तिजोरीत मूळकरापोटी तब्बल १५२ कोटी हून अधिक रक्कमेचा भरणा झाला आहे.**



राज्यातील तत्कालीन आघाडी सरकारने पिंपरी-चिंचवडमधील गुंठा-दीड गुंठा जागा घेवून सर्वसामान्य नागरिकांनी बांधलेली घरे अनधिकृत ठरवली होती. या घरांना नियमित करण्यासाठी २००८ साली शास्तीकर लागू करण्यात आला. शास्तीकर मूळकरापेक्षा जास्त असल्यामुळे त्याचा भरणा करण्यात मिळकतधारकांनी उदासीनता दाखवली होती. त्यामुळे शास्तीकराची थकबाकी तब्बल ८५० कोटींहून अधिक झाली होती. त्यामुळे, महापालिकेच्या आर्थिक प्रगतीवर परिणाम होत होता.

यापार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी २०१४ पासून शास्तीकर सरसकट माफ करण्याबाबत पाठपुरावा सुरू केला होता. २०१७ मध्ये महापालिकेत भारतीय जनता पार्टीची सत्ता आली. त्यानंतर शास्तीकर माफ होईल, अशी अशा होती. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शास्तीकर माफिचे आश्वासन दिले होते. मात्र, २०१९ मध्ये राज्यात सत्ता बदल झाला. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात हा प्रश्न अडीच वर्षे दुर्लक्षीत झाला. त्यानंतर भाजपा-शिवसेना शिंदे गट अशी महायुतीची सत्ता आली. त्यानंतर आमदार लांडगे यांनी पाठपुरावा सक्षमपणे सुरू ठेवला होता.

दरम्यान, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये दि. २१ डिसेंबर २०२२ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला ‘शब्द’ खरा केला. पिंपरी-चिंचवडकरांवर लादलेला शास्तीकर सरसकट माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.



“ सर्वसामान्य नागरिकांनी अर्धा गुंठा- एक गुंठा अशी जमीन घेवून आपल्या हक्काचे घर उभारले होते. ती घरे अनधिकृत ठरवून तत्कालीन राज्य सरकारने सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांच्या मानगुटीवर शास्तीकर लादला होता. राज्य सरकारकडे याबाबत आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द खरा केला. सर्वच मिळकतधारकांनी मूळ कराची रक्कम भरून शास्तीकर माफीचे प्रमाणपत्र घ्यावे. महापालिकेची आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करतो.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### आकडेवारी काय सांगते?

» शास्तीकर माफ केल्याच्या निर्णयापासून म्हणजे दि. २२ डिसेंबर २०२२ पासून १२ डिसेंबर २०२३ पर्यंत शहरातील १८ हजार ३९ मिळकतधारकांनी शास्तीकर माफीचा लाभ घेतला आहे. त्यापैकी ८ हजार ३९७ मिळकतधारकांनी शास्तीकर माफीचे प्रमाणपत्र घेतले आहे. या माध्यमातून महापालिका तिजोरीत १५२ कोटी ९९ लाख ६० हजार ३४६ रुपये जमा झाल्याची नोंद आहे. तसेच, ३२३ कोटी २० लाख ७९ हजार २९१ रुपये इतका शास्तीकर माफ करण्यात आला आहे. थकीत मूळ शास्तीकर जमा झाल्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे.

---

# विधीसंघर्षीत मुलांसाठी पोलिसांची ‘दिशा’!

## » शहरातील 400 हून अधिक मुलांना फुटबॉल प्रशिक्षण : संदेश बोर्डे यांचा विधायक उपक्रम

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून बाल गुन्हेगारी डोकं वर काढत आहे. वाहनांची तोडफोड, मारामारी, यासह मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांमध्येदेखील अल्पवयीन मुलांचा मोठा सहभाग आहे. मुलांना योग्य वेळी योग्य दिशा मिळावी म्हणून पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून गुन्हेगारीच्या दिशेने वळणाऱ्या आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या विधीसंघर्षित बालकांना फुटबॉल खेळण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे.**



पिंपरी-यासाठी संदेश बोर्डे हे शहरातील १८ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४०० पेक्षा अधिक मुलांना फुटबॉल खेळण्याचे प्रशिक्षण देत आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी बाल गुन्हेगारीमध्ये सात ते आठ टक्क्यांनी घट झाली आहे, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांनी दिली. पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात गेल्या अनेक वर्षांपासून बाल गुन्हेगारी ही पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरलेली आहे. बाल गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी आता पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘दिशा’ उपक्रम राबवला जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून दिशा उपक्रमाच्या माध्यमातून अल्पवयीन मुलांना फुटबॉलचे प्रशिक्षण दिले जात आहे. शहरात ७८ झोपडपट्टी असून या ठिकाणी वावरत असलेल्या अठरा वर्षांखालील मुलांना हे फुटबॉलचे प्रशिक्षण दिले जात आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी, गुन्हेगारीच्या दिशेने वळणारे आणि चांगल्या मुलांचा या फुटबॉल प्रशिक्षणात सहभाग आहे.

प्रशिक्षक संदेश बोर्डे म्हणाले, फुटबॉल हा असा एक खेळ आहे जो प्रत्येक खेळाडू त्या बॉल मागे धावतो आणि तुम्हाला शारीरिक श्रम करायला लावतो. क्रिकेटमध्ये मात्र तसं नाही. जेव्हा तुमच्याकडे बॉल येतो तेव्हाच तुम्हाला धावावे लागते. क्रिकेट महागडा खेळदेखील असून फुटबॉलमध्ये केवळ एक बॉल असतो. शूज प्रत्येक मुलाकडे असतो, असं ते म्हणाले.

“ गुन्हेगारी दिशेने वळणाऱ्या आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या विधीसंघर्षित बालकांच्या डोक्यात गुन्ह्यागारीविषयी काही विचार येत नाहीत. एक विधीसंघर्षित बालक स्वतः फुटबॉलचे प्रशिक्षण घेत आहे. तो आधी काही मुलांनाबरोबर घेऊन हप्ते मागायचा, अनेकांना मारहाण करायचा, मात्र आता तो गुन्हेगारीवृत्ती सोडून एक चांगला नागरिक बनण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचबरोबर तो महाविद्यालयीन शिक्षणदेखील घेत आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या या उपक्रमाचं कौतुक नक्कीच आहे. आज दिशा पॅटर्न इतर ठिकाणीदेखील राबवण्याची गरज आहे.

**-संदेश बोर्डे,** प्रशिक्षक




**आज २२ डिसेंबर गीता जयंती. श्रीमद्भगवद्गीतेचे भारतीयांच्या जीवनातील महत्त्व वेगळे सांगायला नको. गीता, तिच्यातील आशय यावर आजही तितक्याच हिरिरीने चर्चा होते. याचे उदाहरण म्हणजे 'लोकसत्ते'त मंगळवार १२ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेला 'भगवद्गीतेतील कर्मरुप हिंसा/ अहिंसा' हा अॅड. राजा देसाई यांचा लेख. त्यावर थोडक्यात प्रतिक्रिया देत आहे.**

त्यावर उत्तर देताना कौशल्य

# अहिंसा हा महाभारतकालीन गुणच नाही...



१. महाभारत हा वैदिक काळाच्या उपरान्त, समाजजीवनाचे अथांग दर्शन घडविणारा जयो नामेतिहासोऽहम् आहे. भगवद्गीता दर्शन हे त्या पश्चातच्या अडीच-तीन हजार वर्षानंतरचे, (कदाचित) चार्वाक, जैन, बौद्धांच्या सामाजिक घुसळीनंतरचे प्रबोधन असावे. ग्रीक (इ. स. पू. ३२७-३२३, अलेक्झांडर व इ.स.पू. १९०/१८० डीमिट्रिस, मिन्यांडर); शक (इ.स. पू. १५०-५७; सन. १५० ते २०० वर्षे राजकीय अस्तित्व); कुशाण (इ.स ४०-१६२); व हुणांच्या (इ.स. ४५० स्कंदगुप्त ते ५४० यशोधर्मने त्यांचा शेवट केला) आक्रमणांनंतर, जैन-बौद्धांच्या अहिंसेच्या अतिरेकानंतर (राजकीय उपद्व्यापानंतर) तेजोहीन, पापभिरू झालेल्या वैदिक शासनकर्ते व समाजासाठी 'अहिंसा परमो धर्मः, धर्मेहिंसा तथैव च।।' (महाभा. अनुशा. अ. ११६-११७). अहिंसा श्रेष्ठ धर्म (गुण) आहे (परंतु) स्वधर्माच्या रक्षणार्थ केलेली हिंसासुद्धा श्रेष्ठतम आहे, हे सांगणे आवश्यक होते. (राजा देसाई यांनी वरील श्लोकाचा पहिला अर्धा भागच उद्धृत केला आहे). महाभारतात कुठेही अहिंसेचे 'गोडवे' गायले गेलेले नाहीत. अहिंसा हा महाभारतकालीन गुण नाहीच. महाभारतातील जीवन रोखठोक आहे. 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानम् अधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्। असे भगवद्गीतेद्वारा सर्वकालीन अभिवचन आहे. पुढे, 'परित्राणाय साधुनां विनाशाय च दुष्कृताम् धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे'... 'मी' पुन्हा पुन्हा अवतार घेईन असे श्रीकृष्ण रुपकातून ईश्वराचे उद्घाटन करतात. धर्म रक्षणार्थ, दुष्कर्मे करणाऱ्यांच्या विनाशासाठी केलेली हिंसा ही हिंसा ठरत नाही, ती आवश्यक असते. येथे युद्ध म्हणजे हिंसा ठरत नाही. 'यतो धर्मस्ततः जयाः।।' हा उद्घोष महाभारतामधून अकरा वेळा येतो. त्यामुळे भगवद्गीतेचा विचार करतांना वरील पाश्वभूमी लक्षात असावी. पुढील काळात हिंदुस्थानावर परकीय लुटारू, विध्वंसक दुष्टांच्या आक्रमणांना सुरवात होऊन हिंदुस्थानाच्या संस्कृती, संपत्ती, ऐश्वर्य यांच्या नष्टचर्याला सुरुवात झाली. तेव्हा या परिस्थितीत अहिंसेसाठी युद्ध टाळणे म्हणजे समाजविघातक दुष्ट शक्तींना मोकळे रान सोडणे ठरले असते. हा सामाजिक 'विवेक' आहे, तीच ईश्वराज्ञा आहे.

२. धर्मप्रचार व प्रसारार्थ हिंसा हा मुद्दा त्याकाळात नव्हताच. तेव्हा हाही गीतेतला विषय नाहीच. अर्थात अशी हिंसा सर्वकालीन निंद्य आहे. असो.

३. अर्जुनाला युद्धासाठी प्रवृत्त करणे येथे गौण आहे (अन्यथा पांडवांवरील अन्यायाचे उल्लेख गीतेत आले असते). शोक, मोह व आसक्ती यामुळे अज्ञानातून अर्जुन आपला स्वधर्म विसरून स्वकर्तव्याची भलावण, कर्तव्याला विन्मुख करू पाहत आहे. क्षत्रिय म्हणून युद्ध हे त्याचे स्वकर्म, क्षत्रियाचा स्वधर्म आहे. विषयाचे सातत्य राखण्यापुरते युद्धाचे उल्लेख येतात. 'आत्मज्ञानावाचून शोक, मोह निवृत्त होणार नाहीत' (इति शंकराचार्य) म्हणून गीतेमधून सर्व चर्चा आत्मज्ञानाची आहे. असे भगवद्गीता हे मोक्षशास्त्र आहे. मोक्ष हा कुठल्याही कृती-कर्मांनी मिळत नाही. वैदिक कर्मकांडे सगुण उपासनांदी द्वारे मोक्ष प्राप्त होत नाही. युद्धाचे फळ मोक्ष आहे असेही सांगितलेले नाही. सवे कर्मे अनासक्तपणे, 'मा फलेषु कदाचन। ' वृत्तीने केल्यास; ज्ञानयुक्त कर्मत्याग-कर्मसंन्यास म्हणजे सकाम बुद्धी सोडून केल्यास बुद्धी कर्माने म्हणजे पाप पुण्यादी कर्मफलांनी लिप्त होणार नाही. 'सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा' बुद्धीच्या समत्व योगाने (बुद्धीयोग) केल्यास यथायोग्य समयी क्रममुक्तीला प्राप्त होशील (भगवद्गीता), तेही जमत नसल्यास सर्व कर्मे, जे जे करशील ते सदैव ईश्वरार्पण होऊन कर. अगदी 'तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध च' सर्वकाली सदैव माझे स्मरण करून युद्ध कर. 'लाभालाभौ जयाजयौ' अशा समत्व बुध्दियोगाने "ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापफलंमवाप्स्यस" युद्धाला तयार हो, कधीच पापाने लिप्त होणार नाहीस.

## संपादकीय »

# शेकोटी-शिमगा!

***उदात्त हेतूने घेतलेल्या निर्णयाचे रूपांतर पुढे कसे केवळ बाह्य उपचारात होते आणि नंतर नंतर तर ते निव्वळ कसे निर्थक कर्मकांड होऊन बसते याचे जिवंत उदाहरण म्हणजे विधिमंडळाचे नागपूर अधिवेशन.***

काहीएक उदात्त हेतूने घेतलेल्या निर्णयाचे रूपांतर पुढे कसे केवळ बाह्य उपचारात होते आणि नंतर नंतर तर ते निव्वळ कसे निर्थक कर्मकांड होऊन बसते याचे जिवंत उदाहरण म्हणजे महाराष्ट्र विधिमंडळाचे नागपूर अधिवेशन. नागपूर हा खरे तर मध्य प्रांताचा मध्यवर्ती भाग. राज्यांची पुनर्रचना झाली तेव्हा त्यास महाराष्ट्रात कोंबण्यात आले. नागपूरकरांस ते मान्य असणे अशक्य. त्यामुळे त्यांना चुचकारण्याचा एक भाग म्हणून वर्षातून एक तरी महाराष्ट्र विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात भरवण्याचे आणि त्या शहरास उपराजधानीचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले गेले. यातील उपराजधानीचा दर्जा म्हणजे काय, याचे ठाम उत्तर देणे अवघड. राज्य प्रशासनात ज्याप्रमाणे उपमुख्यमंत्री हे पद नाही त्याप्रमाणे शहर मानांकनातही उपराजधानी असा काही प्रकार नाही.

**वृद्धमित्र प्रकल्पांतर्गत काम करताना नेहमीप्रमाणे मी वस्तीमध्ये आजीआजोबांच्या गृहभेटीसाठी गेलो होतो. तिथे शकूआजी भेटल्या. त्यांची विचारपूस केली. आजींना त्यांची प्राथमिक माहिती विचारली. साधारण ६५ वय वर्षे असणाऱ्या शकूआजी वस्तीमध्ये एक लहानशा घरात एकट्याच राहतात. त्यांना एक मुलगा आहे आणि तो डॉक्टर आहे.**

# वृद्धांची संख्या वाढत आहे, वृद्ध मित्र कधी वाढणार...?

पण तो बाहेरगावी असतो. तो त्याच्या पत्नी मुलांसहित सुखाने राहतो आहे हे आजींकडून समजले. "तुम्ही का नाही राहात त्याच्यासोबत?" असे विचारले तेव्हा म्हणाल्या, "दहा वर्षांपूर्वी आम्ही त्याचे लग्न थाटामाटात लावून दिले. काही दिवस राहिला आमच्यासोबत आणि नंतर त्याच्या बायकोसहित गेला निघून आम्हाला इथे सोडून, सात आठ वर्षांपूर्वी माझ्या पतीचे निधन झाले, तेव्हापासून मी एकटीच इथे रहाते आहे. माझा मुलगा मात्र इतक्या वर्षात कधीही मला भेटायला आला नाही. त्याने माझी साधी चौकशीदेखील कधी केली नाही. ज्या मुलाला स्वतःच्या आई-वडिलांना कधी भेटावंसं वाटत नाही, तो मला त्याच्याबरोबर घेऊन तरी कसा जाईल?" आजींचं ते बोलणं ऐकून त्यांना काय सांगावं हेच मला क्षणभर समजेनासं झालं. खरंतर मला काही बोलायची गरजच पडली नाही. कारण आजवर कोणाकडेही मन मोकळं करता न आल्याने आजींना



आज माझ्याशी खूप काही बोलावंसं वाटत होतं. त्या न थांबता बोलू लागल्या. पतीनिधनानंतर आजी खूप एकट्या पडल्या होत्या. वाढलेल्या वयामुळे कष्टाची कामं करणंही त्यांना जमेना. आजी त्यांच्या या सगळ्या परिस्थितीबद्दल घडघडा बोलत होत्या आणि मी ते सगळं शांतपणे ऐकत होतो. "एकुलता एक मुलगा म्हणून इतक जपलं, त्याला लाडात वाढवलं, त्याची सगळी काळजी घेतली, परिस्थिती फार चांगली नसतानाही त्याला चांगलं शिक्षण घेता येईल याची तजवीज केली. स्वतःच्या पोटाला पुरेसं नाही पण मुलाला मात्र पोटभर जेवण कसं मिळेल यासाठी दिवसरात्र धडपड करत होतो आम्ही. डॉक्टर झाला आमचा मुलगा! फार कौतुक वाटलं आम्हाला त्याचं. खूप स्वप्नं पाहिली होती आम्ही. आमचा मुलगा आम्हाला चांगले दिवस दाखवील, चांगलं सांभाळील, आमच्या कष्टाचं चीज करील, असं वाटत होतं. त्याचं शिक्षण पूर्ण झालं. स्वतःच्या पायावर उभा राहिला. काही वर्षांपूर्वी त्याचं लग्न करून दिलं. इतक सगळं करून आज हे दिवस मला पाहायला मिळाले. माझ्या पोटचा, हक्काचा मुलगा असूनही, तो चांगला डॉक्टर होऊनही आज माझ्यावर ही वेळ आली आहे. सोबत राहणं तर दूरच पण इतक्या वर्षात आई जिवंत आहे का नाही हे सुद्धा त्याने कधी विचारलं नाही. माझ्या पतीच्या निधनानंतर माझा मुलगाच माझा आधार होता. पण तरीही मी आज निराधारासारखी जगत आहे. मुलगा बंगल्यात राहतो आहे आणि त्याची आई ही अशी कुठेतरी लहानशा घरात एकटीच पडून असते. मुलगा, सुन, नातवंडं असतानाही माझ्याशी आपुलकीने बोलणारं असं कुणीच नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाडमध्ये शिवसेनेच्या दोन्ही गटांत राडा!

## गोगावले यांच्याविरोधातील मोर्चाने वातावरण तापलं

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार गोगावले यांनी नागपूर येथे बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल वक्तव्याचे महाड येथे आज पडसाद उमटले. शिवसेनेचे ठाकरे गट आणि शिंदे गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलिसांनी हस्तक्षेप करून तणाव नियंत्रणात आणला. आमदार गोगावले यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाने महाड येथे आंदोलनाची हाक दिली होती. याची भनक लागताच शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने शिवाजी महाराज चौकात जमले होते.**



दोन्ही गटांचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी जमावबंदी लागू असल्याचे सांगत आंदोलकांना परतण्याच्या सुचना केल्या. पण ठाकरे गट आपल्या कार्यालयाकडे परतत असतानाच दोन्ही गटांतील कार्यकर्ते एकमेकांविरोधात भिडले. पोलीस उपविभागीय अधिकारी श्रीशंकर काळे यांनी शिघ्रकृती दलाच्या मदतीने परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणाबाजी सुरू होती. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर ठाकरे गट (Shiv Sena UBT) आणि शिंदे गट (Shiv Sena Shinde Group) यांच्यात तणावाचे वातावरण आहे. दोन्ही गटांमध्ये वाद झाल्याच्या घटना समोर येत असतात. अशातच आज त्यात आता महाडची (Mahad) भर पडली आहे. शिंदे गटाचे नेते आमदार भरत गोगावले (Bharat Gogawale) यांच्याविरोधातील ठाकरे गटाचा मोर्चा शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी अडवला. यावरून दोन्ही बाजूंनी हमरीतुमरी होऊन बाचाबाची झाली. पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने परिस्थिती आणखी चिघळली नाही. या घटनेनंतर आता थंडीत महाडमधील राजकीय वातावरण मात्र चांगलंच तापलं आहे. महाडमध्ये ठाकरे गट आणि शिंदे गटाचे कार्यकर्ते भिडल्याने परिसरात तणावाचे वातारण निर्माण झालं आहे. आमदार भरत गोगावले यांच्या वक्तव्यावरून या दोन्ही गटात जुंपली. नागपूर अधिवेशनात शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी एका वृत्तवाहिनीसोबत बोलताना केलेल्या वक्तव्यावरून हा राडा झाल्याचे समजते. एका वृत्तवाहिनीशी बोलताना भरत गोगावले यांनी 'बाळासाहेब ठाकरे आता वर गेले आहेत. त्यांचे मत जाणून घ्यायचे असेल तर कोणाला तरी वर जावं लागेल' असे वक्तव्य केले होते. त्यावरून महाडमधील ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते.

### स्मृतीदिनाच्या पूर्वसंध्येलाही राडा

पोलिसांनी दोन्ही गटाची समजूत काढत परिस्थिती नियंत्रणात आणली.आमदार गोगावले यांनी नागपूर येथे बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल वक्तव्याचे महाड येथे आज पडसाद उमटले. शिवसेनेचे ठाकरे गट आणि शिंदे गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलिसांनी हस्तक्षेप करून तणाव नियंत्रणात आणला. आमदार गोगावले यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाने महाड येथे आंदोलनाची हाक दिली होती. याची भनक लागताच शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने शिवाजी महाराज चौकात जमले होते. याआधी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला मुंबईत बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गटात जोरदार राडा झाला होता. यावेळी ठाकरे गटाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिंदे गटाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यावेळी दोन्ही बाजूंकडून आरोप-प्रत्यारोप करण्यात आले होते.दोन्ही गटांचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी जमावबंदी लागू असल्याचे सांगत आंदोलकांना परतण्याच्या सुचना केल्या. पण ठाकरे गट आपल्या कार्यालयाकडे परतत असतानाच दोन्ही गटांतील कार्यकर्ते एकमेकांविरोधात भिडले. . पोलीस उपविभागीय अधिकारी श्रीशंकर काळे यांनी शिघ्रकृती दलाच्या मदतीने परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणाबाजी सुरू होती. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

आमदार गोगावले यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी आज ठाकरे गटाचे कार्यकर्ते महाड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमले होते. त्यावेळी हा राडा झाला. तब्बल दीड तास हा राडा सुरू होता. दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना धक्काबुकी करत होते. यामुळे परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. यामुळे काही प्रमाणात वाहतूक कोंडीही झाली होती. यानंतर येथे मोठ्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला.

# पवार कुटुंबात मॅचफिक्सिंग नाही, स्टॅम्प पेपरवर लिहून देतो

## मार्च महिन्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता : अजित पवार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आता आपण पुढे गेलो आहोत, कुठेही मॅचफिक्सिंग नाही, आपण भूमिका घेतलीये, त्यामध्ये बदल होणार नाही, असं मी स्टॅम्प पेपरवर लिहून देतो, असं भाष्य उपमुख्यमंत्री अजित पवार (AJIT PAWAR) यांनी केलं आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (NCP) अजित पवार गटाच्या बैठकांचं आयोजन करण्यात आलं होतं. तसेच आता आपण जी भूमिका घेतली आहे, त्यावर ठाम राहायचं असं देखील अजित पवारांनी म्हटलं.**

मार्च महिन्यात आचारसंहिता लोकसभा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे संघटनात्क काम वाढवा लक्ष द्या. कारण लोकसभेनंतर चार महिन्यातच विधानसभा लागणार आहेत, अशा सूचना देखील अजित पवारांनी या बैठकीमध्ये कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. मंत्रालयाजवळील महिला विकास मंडळ सभागृहात राष्ट्रवादींच्या बैठकांचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीला अजित पवार यांच्यासह सुनील तटकरे देखील उपस्थित होते. आम्ही कुटुंब म्हणून एकत्र आलो की कार्यकर्त्याला हेच वाटतं की आम्ही एकच आहोत. कशाला



वाईटपणा घ्यायचा असं वाटत असेल तुम्हाला, पण आता आपण पुढे आलो आहोत. कुठेही कसलीही मॅचफिक्सिंग नाही. आता आपल्याला कोणालाही फसवायचं नाहीये. जी भूमिका घेतलीये, त्यात आता कोणताही बदल होणार नाही, हे मी स्टॅम्प पेपरवर लिहून देतो, असं अजित पवारांनी म्हटलं. मार्च महिन्यात आचारसंहिता लोकसभा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे संघटनात्क काम वाढवा लक्ष द्या , लोकसभा नंतर लगेच चार महिन्यात विधानसभा आहे. आता लोकसभा महत्वाची आहे. पण निवडणुकांनंतर विधानसभेचीही तयारी करायला हवी. आपण लोकसभेच्या सर्वाधिक सहा-नऊ जागा जिंकल्या होत्या.

### आग विझवायचं काम करा

बोलताना आणि चर्चा करताना महायुती मित्र पक्ष म्हणून नाराज होणार नाही,याची काळजी घ्या. कुठमित्र पक्ष चुकत असेल तर आम्हास सांगा. पण महायुतीत अंतर पडेल किंवा गैरसमज होईल, असं काही वागू नका. कोणी विचारल तर वरिष्ठ निर्णय घेतील असंच बोला. आगा लावण्याचा प्रयत्न कोणीही करुन नका. कोणी प्रयत्न करत असेल तर वाद वाढवायच्या ऐवजी विझवायचं काम करा,अशा सूचना अजित पवार यांनी दिल्या आहेत. अनेक वेळा वरिष्ठांनी इतर पक्षांशी संधान साधण्याचा प्रयत्न केलाय. प्रत्येकाचा काम करण्याचा काळ असतो. वयोमाना प्रमाणे नवी पिढी पुढे येत असते. त्यांना मार्गदर्शन करावं लागतं मात्र काही जण ऐकायला तयार नव्हते. काही जण जाणीवपूर्वक सांगतायत की हे कमळावर लढणार आहेत असं काही नाही. आपल्याला गद्दारी , मॅच फिक्सिंग करायची नाही, असं अजित पवारांनी म्हटलं.

त्यामुळे आता मागच्या वेळेपेक्षा जास्त जागा आपल्याला जिंकायच्या आहेत, अशा सूचना देखील अजित पवार यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# जनता खरगे-फरगेंना ओळखत नाही

## इंडिया आघाडीकडून पंतप्रधानपदासाठी नितीश कुमारच योग्य

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**इंडिया आघाडीकडून आगामी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधानपदासाठी दलित चेहरा घेऊन भाजपाला आव्हान देण्याची तयारी चालू आहे. 'इंडिया'च्या मंगळवारी झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय झाल्याचं सांगितलं जात आहे. या बैठकीत आघाडीतल्या काही प्रमुख नेत्यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला आहे. यावर अंतिम निर्णय झाला नसला तरी, या प्रस्तावाचे खरगे यांनी पत्रकार परिषदेत थेट खंडनही केलेलं नाही. 'आधी एकत्र येऊन जिंकू, मग पंतप्रधानपदाचा विचार करू', असं मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.**



दरम्यान, इंडिया आघाडीतल्या काही पक्षांकडून मल्लिकार्जुन खरगेंच्या नावाला विरोध होत आहे. त्याचबरोबर अनेक पक्ष आपापल्या प्रमुख नेत्याच्या नावाचा उल्लेख करत आहेत. एका बाजूला इंडिया आघाडी नावाच्या एका छताखाली सर्व विरोधी पक्षांना एकत्र करण्याचे प्रयत्न सुरू असताना दुसऱ्या बाजूला अनेक पक्षांमध्ये मतभेद असल्याने आघाडीत संघर्षदेखील सुरू झाला आहे. त्याचबरोबर पंतप्रधानपदाचा चेहरा कोण होणार हा इंडियासमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे. जनता दल युनायटेड या पक्षाने इंडिया आघाडीच्या निर्मितीपासून पक्षाचे प्रमुख आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नावाचा पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून प्रचार केला आहे.

इंडिया आघाडी तयार करण्यात नितीश कुमार यांचा मोठा वाटा आहे. त्यांनीच पुढाकार घेऊन देशभरातील अनेक पक्षांच्या प्रमुखांशी चर्चा करून सर्व पक्षांना एकत्र करण्यास सुरुवात केली होती. काँग्रेससारखा मोठा पक्ष यात आल्यानंतर नितिश कुमार हे थोडे बाजूला झाले आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे तसेच काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नावांची चर्चा सुरू झाली. परंतु, जनता दल युनायटेड आणि राष्ट्रीय जनता दलचे नेते अजूनही नितीश कुमार यांच्यांच नावाचा उल्लेख करत आहेत. दरम्यान, जदयू आमदार गोपाल मंडल यांनी म्हटलं आहे की, नितीश कुमार हेच पंतप्रधानपदाचे योग्य उमेदवार आहेत. देशातली जनता मल्लिकार्जुन खरगेंना ओळखत नाही. पत्रकार उल्लेख करू लागल्यानंतर काहीजण खरगेंना ओळखू लागले आहेत. तसेच आत्ता काँग्रेस अध्यक्ष म्हणून त्यांचं नाव ऐकायला मिळत आहे. परंतु, देशभरातले लोक नितीश कुमार यांना ओळखतात. खरगेंना कोणीच ओळखत नाही. काही ठराविक लोक खरगेंना ओळखतात, सामान्य जनता त्यांना ओळखत नाही. त्यामुळे नितीश कुमारच पंतप्रधान होतील, कारण संपूर्ण देश त्यांना ओळखतो. इंडिया आघाडी तयार करण्यात नितीश कुमार यांचा मोठा वाटा आहे. त्यांनीच पुढाकार घेऊन देशभरातील अनेक पक्षांच्या प्रमुखांशी चर्चा करून सर्व पक्षांना एकत्र करण्यास सुरुवात केली होती. काँग्रेससारखा मोठा पक्ष यात आल्यानंतर नितिश कुमार हे थोडे बाजूला झाले आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे तसेच काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नावांची चर्चा सुरू झाली. परंतु, जनता दल युनायटेड आणि राष्ट्रीय जनता दलचे नेते अजूनही नितीश कुमार यांच्यांच नावाचा उल्लेख करत आहेत.

### पंतप्रधानपदाचा चेहरा कोण ?

» इंडिया आघाडीतल्या काही पक्षांकडून मल्लिकार्जुन खरगेंच्या नावाला विरोध होत आहे. त्याचबरोबर अनेक पक्ष आपापल्या प्रमुख नेत्याच्या नावाचा उल्लेख करत आहेत. एका बाजूला इंडिया आघाडी नावाच्या एका छताखाली सर्व विरोधी पक्षांना एकत्र करण्याचे प्रयत्न सुरू असताना दुसऱ्या बाजूला अनेक पक्षांमध्ये मतभेद असल्याने आघाडीत संघर्षदेखील सुरू झाला आहे. त्याचबरोबर पंतप्रधानपदाचा चेहरा कोण होणार हा इंडियासमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे. जनता दल युनायटेड या पक्षाने इंडिया आघाडीच्या निर्मितीपासून पक्षाचे प्रमुख आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नावाचा पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून प्रचार केला आहे.त्याचबरोबर पंतप्रधानपदाचा चेहरा कोण होणार हा इंडियासमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे.

# निवडणुकांसाठी भाजपचा नवा नारा

## भाजपकडून नारेबाजी सुरू करण्यात आली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकांसाठी (LOKSABHA ELECTION) भाजपकडून (BJP) नवा नारा देण्यात आलाय. 'सपने नहीं हकीकत बुनते हैं, इसलिए तो सब मोदी को चुनते हैं' असा नवा नारा आता भाजपकडून दिला जातोय. लोकसभा निवडणुकीच्या तयारीसंदर्भात शुक्रवार 22 डिसेंबर पासून दिल्लीत (NEW DELHI) भाजपच्या बैठकांचं सत्र सुरु होणार आहे.**



दोन दिवसीय बैठकांच्या आयोजन करण्यात आलं असून यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा (J.P NADDA) यांच्यासह अनेक नेते सहभागी होणार होतील. सध्या देशभरात लोकसभा निवडणुकांचे वारे वाहत आहेत. त्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षांकडून तयारी सुरु करण्यात आलीये. भाजपने देखील लोकसभा निवडणुकांसाठी कंबर कसली असून आता जोरदार नारेबाजीला देखील सुरुवात केल्याचं पाहायला मिळतंय. संकल्पच्या बरोबरच छत्तीसगड, राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि मिझोराममधील विधानसभा निवडणुकांच्या संदर्भात देखील चर्चा होणार असल्याची माहिती देण्यात आलीये. खरतंर भाजपने राजस्थान, छत्तीसगड आणि मध्य प्रदेश या हिंदी भाषिक राज्यांमध्ये भाजपने मोठा विजय मिळवलाय. पण तेलंगणामध्ये मात्र काँग्रेसने बाजी मारली. पुढील वर्षात होणाऱ्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या राज्यांच्या विधानसभा या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात होत्या. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्यापूर्वीच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप लवकरच उमेदवारांची घोषणा करण्यास सुरुवात करेल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात भाजपची लोकसभा निवडणुकांसाठीची पहिली यादी येऊ शकते. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपने सार्वत्रिक निवडणुकीत स्वबळावर दोनदा बहुमत मिळवले आहे. 2014 मध्ये पक्षाने 'अच्छे दिन आने वाले हैं' असा नारा दिला होता. तर 2019 मध्ये भाजपने 'पुन्हा एकदा मोदी सरकार' असा नारा दिला. 'सपने नहीं हकीकत बुनते हैं, इसलिए तो सब मोदी को चुनते हैं' असा नवा नारा भाजपकडून देण्यात आलाय. तसेच 2024 च्या निवडणुकांमध्ये भाजप हॅट्रीक मारणार असल्याचा दावा देखील सातत्याने पंतप्रधान मोदी करत असल्याचं पाहायला मिळतंय.

# सरकार खरंच देशाची राज्यघटना बदलणार?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

सध्या देशभरात पुढील वर्षी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकांची चर्चा आहे. अवघ्या काही महिन्यांत देशभरात लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू होईल. या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपा सरकारवर टीका केली जात आहे. संसदेतील खासदारांचं निलंबन, कायदे पारित करण्याचा वेग यावरून काँग्रेस पक्षानं मोदी सरकारवर परखड टीका केली जात आहे. त्यातच आता २०२४ च्या निवडणुकांनंतर मोदी सरकार देशाची राज्यघटनाच बदलणार असल्याचेही दावे केले जात असून त्यावर आता खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्पष्टीकरण दिलं आहे. ब्रिटिश वर्तमानपत्र फायनान्शियल टाईम्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये मोदींनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०२४च्या सार्वत्रिक निवडणुका जिंकण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. "लोकांना हे समजलं आहे की आता देश मोठी भरारी घेण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. त्यामुळे २०२४च्या निवडणुकांमध्ये आमचा विजय होईल, याविषयी मला पूर्ण खात्री आहे. लोकांना ही भरारी घ्यायची आहे. आणि कोणत्या पक्षानं देशाला इथपर्यंत मजल मारून दिली याचीही लोकांना पूर्ण कल्पना आहे", असंही मोदी म्हणाले. "देशातील सामान्य माणसाच्या आयुष्यात मोदी सरकारने मोठा बदल घडवू आणला असून १० वर्षांपूर्वीच्या त्यांच्या अपेक्षा आणि आजच्या त्यांच्या अपेक्षा यात जमीन-आस्मानाचा फरक आहे", असंही मोदींनी नमूद केलं.


# इश्कबाज अभिनेत्री अडकली लग्नबंधनात!



टीव्ही अभिनेत्री श्रेनू पारीख लग्न बंधनात अडकली आहे. तिने तिचा प्रियकर अक्षय म्हात्रेसोबत लग्न केले आहे. श्रेनू पारीख आणि अक्षय म्हात्रेने गुरुवारी कुटुंबातील सदस्य आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत लग्न केले. श्रेनूच्या मूळ गावी वडोदरा येथे हा भव्य विवाहसोहळा पार पडला. दोघांच्या लग्नाचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. या फोटोत कपल एकदम रॉयल आणि क्लासी दिसत आहे. तीन दिवसांच्या प्री-वेडिंग इव्हेंटनंतर श्रेनू अन् अक्षयचा लग्न सोहळा पार पडला. या जोडप्यांवर चाहते शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. सोशल मीडियावर श्रेनू पारीख आणि अक्षय म्हात्रेने लग्नाचे फोटो शेयर केले आहेत. या फोटोत श्रेनू मरून आणि ऑरेंज सिक्वेन्स लेहेंग्यात सुंदर दिसत आह. तिने पारंपारिक दागिन्यांसह हा लुक पूर्ण केला होता. तर अक्षयने किरमिजी रंगाची शेरवानी परिधान केली होती आणि पांढऱ्या पगडीसह त्याला रॉयल टच दिला होता. श्रेनूने या फोटोच्या कॅप्शनमध्ये लिहिले, 'एकत्र कायमचे.' यासोबतच त्यांनी लग्नाची तारीख 21 डिसेंबर 2023 सांगितली. श्रेनू आणि अक्षयच्या मेहंदी आणि हळदी सोहळ्याचे फोटोही त्यांनी शेयर केले आहेत. या जोडप्याने वडोदरा येथे जवळचे मित्र आणि कुटुंबासह एक पार्टी आयोजित केली होती.

# प्रभासला अपयशातून बाहेर काढणारा सालार

काही वर्षांपूर्वी हिंदीमध्ये काही चित्रपट येत. ज्यामध्ये नायकाला हिंसा करण्यापासून कधी त्याची पत्नी, कधी त्याची आई तर कधी बहीण तर कधी प्रेयसी रोखायची, त्याला शपथ घालायची. मग असे काही प्रसंग यायचे की या सगळ्या त्याला शपथ तोडून मार डाल उसे असे म्हणत असत आणि तो मग त्यांना ठार मारून त्यांचा बदला घेत असे. सालारमध्येही अशीच एक आई आहे जी आपल्या मुलाला हिंसेपासून दूर ठेयू पाहात असते. मुलाबरोबर ती आसाममधील एका छोट्याशा तिनसुखिया नावाच्या गावात राहात असते. मुलगा कोळशाच्या फॅक्टरीत काम करू लागतो. सुखाचे दिवस असतात, मुलगा आईच्या अगदी आज्ञेत असतो, पण त्यांच्याकडे परदेशातून एक मुलगी येते आणि अशा काही घटना घडतात की आई मुलाला हिंसा करण्यास परवानगी देते. त्यानंतर त्या मुलीला त्या मुलाचा इतिहास सांगितला जातो आणि तो इतिहास म्हणजेच प्रभासचा नवा चित्रपट सालार- पार्ट वन सीजफायर. बाहुबलीनंतर प्रभासचे आलेले साहो, राधेश्याम, आदिपुरुष चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरफ्लॉप ठरले होते. त्यामुळे प्रभासची मार्केट व्हॅल्यूही कमी होत होती. प्रभासला बाहुबलीसारख्या आणखी एका हिटची अत्यंत आवश्यकता होती आणि ती गरज सालारने पूर्ण केली आहे. रिलीजपूर्वीच चित्रपटाची खूप हवा होती आणि ती सार्थही होती असे चित्रपट पाहिल्यावर जाणवते. चित्रपटाचे ट्रेलर आणि टीझर पाहून हा आणखी एक केजीएफच्या धर्तीवरचा चित्रपट आहे की काय अशी शंका येत होती पण ती शंकाही फोल ठरली. सालार बाहुबलीप्रमाणेच वेगवान घटनांनी भरलेला ॲक्शनपॅक्ड चित्रपट आहे. चित्रपटात प्रचंड हिंसा आहे. अगदी हॉलीवुडच्या सिल्व्हेस्टर स्टॅलन, अरनॉल्डच्या हिंसात्मक किंवा किनू रिव्हसच्या जॉन विक स्टाईलप्रमाणे चित्रपटात हिंसेचे प्रमाण प्रचंड आहे. नुकत्याच आलेल्या रणबीर कपूरच्या ॲनिमलमध्येही अशाच प्रकारची हिंसा होती. अर्थात त्या चित्रपटाचा दिग्दर्शकही दक्षिणेकडचाच आहे.



सालारची कथा सुरु होते 1917 पासून. भारतात खानसार नावाचं एक शहर असते. स्वातंत्र्यानंतर त्या गावाचे नाव नकाशावरून पुसले जाते पण तेथे अजूनही राजामनार नावाचा राजाच राज्य करीत असतो. तो केवळ राज्यच करीत नाही तर दोन नंबरच्या धंद्यात तो देशात अग्रेसर आहे. त्याचे राज्य हडपण्यासाठी सरदार कट रचत असतात. त्याचा दुसऱ्या पत्नीपासून झालेला मुलगा वर्धासुद्धा गादीवर बसण्याची इच्छा बाळगून असतो. त्यातच वेदा (प्रभास) आणि वर्धा (पृथ्वीराज सुकुमारन) या दोन मित्रांची कथा समोर येते. जेव्हा जेव्हा वर्धाला गरज असते वेदा त्याच्या मदतीला धावून जातो. त्यामुळेच वर्धा देवाला सालार म्हणजेच सरकार म्हणून बोलवत असतो. प्रभासला चांगला दिग्दर्शक आणि चांगली भूमिका मिळाली की तो तिचे सोने करतो, हो त्याने बाहुबलीमध्ये दाखवले होते आणि पुन्हा एकदा त्याची प्रचिती दिली आहे.

# सुकेशची जॅकलीनला धमकी?

महाठग सुकेश चंद्रशेखरने बॉलिवूड अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस विरुद्ध कधीही न दाखवलेले पुरावे उघड करण्याची धमकी दिली आहे.सुकेशला माझ्याबद्दलची माहिती देणे बंद करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती करणारी याचिका जॅकलिनने दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केली होती. याशिवाय २०० कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात तिच्याविरुद्ध नोंदवण्यात आलेला FIR रद्द करण्याची विनंतीही तिने केली होती. आता इंडिया टुडेच्या रिपोर्टनुसार, सुकेशने जॅकलिनचे नाव न घेता एक पत्र लिहिले आहे. यामध्ये त्याने एका व्यक्तीचा पर्दाफाश करणार असल्याचे म्हटले आहे. यासाठी तो त्या व्यक्तिच्या चॅट्स, स्क्रीनशॉट्स आणि रेकॉर्डिंग्स रिलीज करेल,असं म्हटलं जातंय रिपोर्टनुसार सुकेशने दावा केला आहे की, "या व्यक्तिच्या सोशल मीडिया अकाऊंटची पोहोच वाढवण्यासाठी त्याने पैसे दिले होते." २०० कोटींच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणातील आरोपी सुकेशने पत्रात लिहिले आहे की, "जगाला सत्य कळले पाहिजे. खरे सत्य." दरम्यान, सुकेशच्या पत्रांबाबत जॅकलिनने बुधवारी दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टात धाव घेतली. तिने मंडोली कारागृहाचे अधीक्षक आणि दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेला (EOW) सांगितलं की, "चंद्रशेखरला तिच्याबद्दल आणखी कोणतेही पत्र, विधाने किंवा मॅसेज देऊ नये," अशा सूचना तिने दिल्या.

# 'फाइटर'चं दुसरं गाणं म्हणजे बेशरम रंग 2.0?

अभिनेता हृतिक रोशन त्याच्या आगामी 'फायटर' चित्रपटामुळे सतत चर्चेत आहे. एरियल ॲक्शन फ्रँचायझीचा हा पहिला चित्रपट सिद्धार्थ आनंद याने दिग्दर्शित केला आहे. प्रेक्षक या चित्रपटाच्या प्रदर्शनाची आतुरतेने वाट पाहत आहेत. 'फायटर'मध्ये हृतिक रोशनशिवाय दीपिका पदुकोण आणि अनिल कपूर मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. दरम्यान, आता 'फाइटर'चा टिझर आणि पहिल्या गाण्यानंतर आता फायटरचे दुसरे गाणे रिलीज झाले आहे. हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोण यांची जोडी कमाल दिसत आहे. 'शेर खुल गये' या गाण्यानंतर 'फायटर'चे दुसरे गाणे 'इश्क जैसा कुछ' रिलीज झाले आहे. आता दीपिका आणि हृतिकची जबरदस्त केमिस्ट्री या गाण्यात पाहायला मिळत आहे. 'इश्क जैसा कुछ' हे गाणे कुमार यांनी लिहिले आहे. तर विशाल-शेखर, शिल्पा राव आणि मेलो डी यांनी गायले आहे.



# सुशांतचं नाव घेऊन सहानुभूती कशाला?

सध्या टिव्ही विश्वातील सर्वात लोकप्रिय शो बिग बॉस 17 प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. मात्र घरात स्पर्धकांमध्ये जोरदार वादही पहायला मिळत आहे. एकीकडे अंकिता आणि विकीच्या नात्यात दुरावा आला आहे तर दुसरीकडे घरात कॅप्टन्सी टास्क दरम्यान खूप गोंधळ झाला आहे. नील भट्ट, अनुराग डोवाल आणि ऐश्वर्या शर्मा यांच्यासोबत अंकिता लोखंडेचेही नाव नॉमिनेशन टास्कमध्ये दिले आहे. त्यामुळे आता अंकिता लोखंडे स्वतःला वाचवण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे. बिग बॉस 17 च्या लेटेस्ट एपिसोडमध्ये कॅप्टन्सी टास्कनंतर ज्यानंतर घरातील सर्व सदस्य अंकितावर रागावले आणि अंकिताच्या विरोधात गेले आहे. त्यातच नेटकऱ्यांनीही अंकितावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. बिग बॉसच्या घरात पक्षपातीपणा केला जात असं म्हटलं जात. मात्र आता नेटकऱ्याबरोबरच 'आई कुठे काय करते' आणि 'बिग बॉस मराठी'च्या दुसऱ्या सीझनची स्पर्धक अभिनेत्री रुपाली भोसले हिने देखील अंकितावर टीका केली आहे. रुपालीने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत अंकितावर टीका केली आहे. की आपल्या पोस्टमध्ये लिहिते, अंकीता तू पहिल्या दिवसापासूनच सांगतेस की मी स्वतंत्र खेळतेय. की स्ट्रॉंग आहे. करण जोहर तुझ्याबद्दल जे म्हणाले ते एकदम परफेक्ट आहे. जर तू स्वतःला स्ट्रॉंग म्हणवतेस तर प्रत्येक आठवड्यात नॉमिनेशन टास्क झाल्यावर तू सुशांत सिंग राजपूतचं नाव का घेतेस? आणि ते सुद्धा या खेळात?

# पुनियाने फूटपाथवर ठेवला ‘पद्मश्री’!

## » मोदींना भेटू न दिल्याने पंतप्रधानांच्या घराबाहेर ठेवलं पदक

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांचे सहकारी संजय सिंह यांनी रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या (WFI – कुस्ती महासंघ) अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली आहे. या निकालामुळे ज्या कुस्तीपटूंनी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर महिला कुस्तीपटूंचं लैंगिक शोषण केल्याचे आरोप करत आंदोलन केलं होतं त्यांच्यात नाराजी पसरली आहे.**

संजय सिंह अध्यक्ष होताच बजरंग पुनिया, साक्षी मलिक आणि विनेश फोगाटने नाराजी व्यक्त केली. या तिघांनी कुस्तीपटूंच्या आंदोलनाचं नेतृत्व केलं होतं. दरम्यान, संजय सिंह निवडणूक जिंकल्यानंतर साक्षी मलिकने कुस्तीला कायमचा रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. तर कुस्तीपटू बजरंग पुनिया यानेही मोठा निर्णय घेतला आहे. “मी माझा पद्मश्री पुरस्कार पंतप्रधानांना परत करणार आहे”, अशी त्याने घोषणा केली होती. त्यानुसार बजरंगने त्याच्या पुरस्काराचा त्याग केला आहे. पद्मश्री पुरस्कार परत करण्याची घोषणा केल्यानंतर काहीच वेळात बजरंग पुनिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुरस्कार परत करण्यासाठी निघाला. परंतु, पीएम आवासाजवळ तिथल्या सुरक्षारक्षकांनी बजरंगला रोखलं. बजरंग पंतप्रधानांपर्यंत पोहोचू शकला नाही. त्यामुळे त्याने पंतप्रधानांच्या घराजवळच्या पदपथावर (फूटपाथ) त्याचा पद्मश्री पुरस्कार ठेवला आणि तिथून निघून गेला. भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदासाठी गुरुवारी (२१ डिसेंबर) निवडणूक पार पडली. संजय सिंह यांनी या निवडणुकीत माजी कुस्तीपटू अनिता शेरॉन यांचा पराभव केला. एकूण ४७ जणांनी या निवडणुकीत मतदान केलं. यापैकी ४० मतं संजय सिंह यांच्या पारड्यात पडली तर अनिता यांना केवळ सात मतं मिळाली. निवडणुकीच्या या निकालानंतर कुस्तीपटू नाराज झाले आहेत. दरम्यान, कुस्तीपटू बजरंग पुनियाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्याने म्हटलं आहे की, “मला आशा आहे की, तुमची प्रकृती ठीक असेल. तुम्ही देशाच्या सेवेमध्ये व्यस्त असणार. तुमच्या व्यस्ततेदरम्यान मी आपलं लक्ष कुस्तीकडे वळवू इच्छितो. आपल्याला माहितच आहे की, यावर्षी जानेवारी महिन्यात भारतीय महिला कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती



महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक अत्याचाराचे आरोप केले होते. त्या महिला कुस्तीपटूंनी आंदोलन सुरू केले, तेव्हा मीही त्यात सहभागी झालो होतो. सरकारने आंदोलकर्त्यांना ठोस आश्वासन दिल्यानंतर जानेवारी महिन्यातच कुस्तीपटू आपापल्या घरी निघून गेले. मात्र तीन महिन्यांनंतरही ब्रिजभूषण सिंह यांच्यावर एफआयआरही दाखल झाला नव्हता.“एप्रिल महिन्यात कुस्तीपटूंनी पुन्हा एकदा आंदोलन केलं. तरही बृजभूषण सिंह यांच्यावर गुन्हा दाखल झाला नाही. शेवटी कुस्तीपटूंना न्यायालयात जाऊन गुन्हा दाखल करावा लागला. जानेवारीमध्ये तक्रारदार महिलांची संख्या १९ होती, जी एप्रिल महिना येईपर्यंत सात राहिली. म्हणजे केवळ तीन महिन्यात बृजभूषण सिंहने आपल्या ताकदीच्या जोरावर १२ महिलांना न्याय मिळण्यापासून अडवले. आमचे आंदोलन ४० दिवस चालले या ४० दिवसांत आणखी एक महिला मागे हटली. आमच्यावर खूप दबाव टाकला गेला. आंदोलन करू नये म्हणून दिल्लीच्या बाहेर काढण्यात आले. आम्ही आमची पदकं गंगा नदीत वाहण्याचा निर्णय घेतला. आम्ही गंगा तटावर गेलो. परंतु, तिथे आम्हाला आमच्या प्रशिक्षकांनी आणि शेतकरी नेत्यांनी अडवलं. त्यानंतर गृहमंत्री अमित शाह यांच्याशी आमचं बोलणं झालं. त्यांनी आम्हाला महिला कुस्तीपटूंना न्याय मिळवून देऊ असं आश्वासन दिलं. त्याचबरोबर कुस्ती महासंघातून बृजभूषण सिंह आणि त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना, त्याचबरोबर त्यांच्या साथीदारांना बाहेर करू असं आश्वासनही दिलं होतं. परंतु, तसं काहीच झालं नाही.संजय सिंह अध्यक्ष होताच बजरंग पुनिया, साक्षी मलिक आणि विनेश फोगाटने नाराजी व्यक्त केली. या तिघांनी कुस्तीपटूंच्या आंदोलनाचं नेतृत्व केलं होतं. दरम्यान, संजय सिंह निवडणूक जिंकल्यानंतर साक्षी मलिकने कुस्तीला कायमचा रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. तर कुस्तीपटू बजरंग पुनिया यानेही मोठा निर्णय घेतला आहे. “मी माझा पद्मश्री पुरस्कार पंतप्रधानांना परत करणार आहे”, अशी त्याने घोषणा केली होती. त्यानुसार बजरंगने त्याच्या पुरस्काराचा त्याग केला आहे. पद्मश्री पुरस्कार परत करण्याची घोषणा केल्यानंतर काहीच वेळात बजरंग पुनिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुरस्कार परत करण्यासाठी निघाला. परंतु, पीएम आवासाजवळ तिथल्या सुरक्षारक्षकांनी बजरंगला रोखलं. बजरंग पंतप्रधानांपर्यंत पोहोचू शकला नाही. त्यामुळे त्याने पंतप्रधानांच्या घराजवळच्या पदपथावर (फूटपाथ) त्याचा पद्मश्री पुरस्कार ठेवला आणि तिथून निघून गेला.

### आमच्यावर खूप दबाव टाकला गेला

» संजय सिंह यांनी या निवडणुकीत माजी कुस्तीपटू अनिता शेरॉन यांचा पराभव केला. एकूण ४७ जणांनी या निवडणुकीत मतदान केलं. यापैकी ४० मतं संजय सिंह यांच्या पारड्यात पडली तर अनिता यांना केवळ सात मतं मिळाली. निवडणुकीच्या या निकालानंतर कुस्तीपटू नाराज झाले आहेत. शेवटी कुस्तीपटूंना न्यायालयात जाऊन गुन्हा दाखल करावा लागला. जानेवारीमध्ये तक्रारदार महिलांची संख्या १९ होती, जी एप्रिल महिना येईपर्यंत सात राहिली. म्हणजे केवळ तीन महिन्यात बृजभूषण सिंहने आपल्या ताकदीच्या जोरावर १२ महिलांना न्याय मिळण्यापासून अडवले. आमचे आंदोलन ४० दिवस चालले या ४० दिवसांत आणखी एक महिला मागे हटली. आमच्यावर खूप दबाव टाकला गेला. आंदोलन करू नये म्हणून दिल्लीच्या बाहेर काढण्यात आले. भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांचे सहकारी संजय सिंह यांनी रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या (WFI – कुस्ती महासंघ) अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली आहे.

# दीप्ती शर्मासह चार फलंदाजांनी झळकावले अर्धशतक!

## » भारताने दुसऱ्या दिवसअखेर घेतली 157 धावांची आघाडी

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला संघांमध्ये एकमेव कसोटी खेळली जात आहे. ऑस्ट्रेलियन संघाला २१९ धावांत गुंडाळल्यानंतर भारतीय संघाने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा पहिल्या डावात १५७ धावांची आघाडी घेतली आहे.**



दुस-या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने सात गड्यांच्या मोबदल्यात ३७६ धावा केल्या होत्या. सध्या पूजा वस्त्राकर आणि दीप्ती शर्मा क्रीजवर आहेत. शफाली वर्मा ४० आणि स्मृती मंधाना ७४ धावा करून बाद झाल्या. त्यानंतर स्नेह राणाला नऊ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून ऍशले गार्डनर आणि जेस जोनासेन यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. यानंतर ऋचा घोष आणि जेमिमा यांनी चौथ्या विकेटसाठी ११३ धावांची भागीदारी केली.

ही भागीदारी किम गर्थने तोडली. तिने रिचाला बाद केले. रिचा १०४ चेंडूंत सात चौकारांच्या मदतीने ५२ धावा करून बाद झाली. त्याचवेळी जेमिमानेही (७३) आपले अर्धशतक पूर्ण केले. कर्णधार हरमनप्रीत कौर खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतली, तर यास्तिका भाटियाला केवळ एक धाव करता आली. यानंतर जेमिमाह रॉड्रिग्स १२१ चेंडूंत नऊ चौकारांच्या मदतीने ७३ धावा करून बाद झाली. तिला ऍशले गार्डनरने सदरलँडच्या हाती झेलबाद केले.

यानंतर दीप्ती आणि पूजाने पुन्हा आठव्या विकेटसाठी १०२ धावांची भागीदारी केली. दीप्ती ७० धावा करून आणि पूजा ३३ धावा करून क्रीजवर आहे. तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २१९ धावांवर आटोपला. बेथ मूनीने ४०, ताहिला मॅकग्राने ५० आणि कर्णधार ॲलिसा हिलीने ३८ धावा केल्या. याशिवाय किम गर्थ २८ धावा करून नाबाद राहिली. सदरलँड (१६), जोनासेन (१९) आणि लॉरेन चीटल सहा आणि अलाना किंग पाच धावा केल्यानंतर बाद झाले. फोबी लिचफिल्डला खातेही उघडता आले नाही, तर एलिस पेरी चार धावा करून बाद झाली. भारताकडून पूजा वस्त्राकरने चार विकेट घेतल्या. तर स्नेह राणाने तीन गडी बाद केले. दीप्ती शर्माने दोन गडी बाद केले.

### भारताचा पहिला डाव

» शफाली वर्मा ४० आणि स्मृती मंधाना ७४ धावा करून बाद झाल्या. त्यानंतर स्नेह राणाला नऊ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून ऍशले गार्डनर आणि जेस जोनासेन यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. यानंतर ऋचा घोष आणि जेमिमा यांनी चौथ्या विकेटसाठी ११३ धावांची भागीदारी केली.